RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र
भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ११, अंक ३१] गुरुवार ते बुधवार, जुलै ३१-ऑगस्ट ६, २०२५/श्रावण ९-१५, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

प्राधिकृत प्रकाशन

संकीर्ण सूचना व जाहिराती

बृहन्मुंबई महानगरपालिका

जाहीर सूचना

क्रमांक उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) १०२८ प. उ. / पी. व. आर.

अद्ययावत मुंबई महानगरपालिकेच्या कायदा, १८८८, (आजतागायत सुधारीत) च्या कलम २९७ (१) (ब) च्या तरतुदीनुसार जाहीर सूचना देण्यात येत आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/दक्षिण विभागातील ६.१० मी. रुंदीची वाहतूक व समन्वय विभागाची मंजूर नियमित रेषेला ९.१५ मी. ची नियोजित नियमित रेषा विहित करण्यात येत आहे जी गोरेगाव (प.) येथील न.भू.क्र. ७७३, ७७४, ७७५, ७७६अ, ७७६ब, ७७७, ७९३, ७९४ आणि ८२० मौजे पहाडी गोरेगाव पश्चिम आणि न. भू.क्र. १४ मौजे पहाडी एकसर यांनी बाधित होते.

सदर ९.१५ मी. रुंद प्रस्तावित नियमित रेषा, मा. महानगरपालिका आयुक्त यांनी मंजुरी क्र. एम.सी.पी./३९८१, दि. २५.०४.२०२५ अन्वये तत्वतः मंजूर केलेली आहे. सदर नकाशा क्र. स.अ./ सर्वेक्षण / प. उ.-२/५६/२०२४, उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) प. उ.- २ यांच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळेत पाहणीकरिता खुला ठेवण्यात आलेला असून, सदर कार्यालयाचा पत्ता पुढीलप्रमाणे आहेः उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) प.उ. २, पहिला मजला, संस्कृती कॉम्प्लेस, सी विंग, ९० फूट डी.पी. रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१. तसेच सहाय्यक आयुक्तांचे कार्यालय पी / दक्षिण विभाग, न.भू.क्र. ७४६ मौजे पहाडी गोरेगाव पश्चिम, एस. वी. रोड, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ या ठिकाणीही कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सदर नकाशा पाहणीकरिता उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सदर सूचनेच्या अधिकृत **शासकीय राजपत्रात** व स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सदर ९.१५ मी. रुंद प्रस्तावित नियमित रेषेबाबत जनतेकडून सूचना/हरकती आता मागवित आहोत. सदर सूचना / हरकतीवर खाली सही करणारे सुनावणी देतील आणि सदर प्रस्तावित नियमित रेषेस अंतिम स्वरुप देताना व स्थापत्य समिती व महानगरपालिकेची अंतिम मंजुरी मागताना सदर सूचना/हरकतींचा विचार करण्यात येईल.

सदर सूचना आणि / वा हरकती लिखित स्वरुपात उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) पश्चिम उपनगरे - २ आणि सहाय्यक आयुक्त (पी/ दक्षिण) विभाग यांच्या नावे उपरोक्त वैधानिक ३० दिवसांच्या कालावधीत त्यांच्या उपरोक्त नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावाव्यात. उपरोक्त तारखेच्या आधी आणि नंतर दिलेल्या सूचना आणि/वा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. "विद्यमान रस्त्याच्या प्रस्तावित नियमित रेषेसंबंधी सूचना/ हरकती" असे ठळक अक्षरांमध्ये लिहिलेल्या बंद लिफाफ्यामध्ये सूचना/हरकती कळवावाव्यात.

मुंबई,
दिनांक ८ जुलै २०२५.

सी. डी. चौधरी,
उप्र. अभि (इमारत प्रस्ताव) प.उ.-२.

गणेश पवार,	**पंकज बनसोड,**	**एस.एच. संखे,**
दु.अ सर्वेक्षण (पी/दक्षिण).	स. अ (सर्वेक्षण) (पी व आर).	का. अ (इमारत प्रस्ताव) 'पी'.

PRO/947/ADV/2025-26.

BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION

Public Notice

No Dy. Ch.E (DP) 1028 W.S.P&R

Is hereby given pursuant to section 297(1)(b) of the Mumbai Municipal Corporation Act, 1888 as modified up to date, that the 9.15 mt. wide Proposed R.L. to the existing road having 6.10 mt. wide sanctioned R.L. of E.E.(T & C) know as Swami Narayan Mandir Road affecting land bearing CTS No. 773, 774, 775, 776A, 776B, 777, 793, 794 and 820 of Village Pahadi Goregaon West and CTS No. 14 of Village Pahadi Eksar in P/South ward is prescribed.

As per in principle approval by the Hon'ble Municipal Commissioner u/no. MCP/3981/Dated 25.04.2025, copy of plan u/no. A.E. (Survey)/WS-II/56/2024 showing the 6.10 mt. wide sanctioned R.L. of E.E.(T & C) and the Revised 9.15 mt. R.L proposed to be prescribed in substitution thereof as aforesaid is kept open for inspection during office hours on any working days in the office of Dy.Ch.E.(B.P.)WS-II, whose office is situated at 1st Floor, C-Wing, Sanskruti Complex, 90 Feet Road, Thakur Complex, Kandivali (East), Mumbai 400 101 and also available for inspection in the office of the Assistant Commissioner (P/South) ward, P/South Ward Office Building, CTS No. 746, S. V. Road, Goregaon (West), Mumbai 400 104.

The suggestions and/or objections are now invited from the public in respect of the said 9.15 Mt. wide proposed R.L within (Thirty) days from the date of publication of this notice in the official *Government Gazette* and local Newspapers and same would be heard by the undersigned and would be considered while finalizing and submitting the said proposal of R.L. to Works Committee and Corporation.

The suggestions and/or objections may be communicated in writing to the Dy.Ch.E.(B.P.)W.S.II and or Assistant Commissioner (P/South) ward within above said statutory notice period of 30 days at their office at above mentioned address. The suggestions and/or objections received before and after the aforesaid date will not be considered. The envelopes forwarding the suggestions/objections may be superscribed in bold letters “Suggestions/Objections to the proposed R.L. of Existing Road”.

Mumbai,
dated 8th July 2025.

C. D. CHAUDHARI,
Dy.Ch.E.(B.P.)W.S.II.

GANESH PAWAR, S.E. (Survey) P/S.	PANKAJ BANSOD, A.E. BP(Survey) WS-II.	SANTOSH SANKHE, E.E.(BP)P WS-II.

PRO/ 947 /ADV/2025-26.

Serial No. M-257

बीएसई लिमिटेड
बीएसई लिमिटेडचे नियम आणि उपविधी

सेबीकडून मिळालेल्या मंजुरीनुसार, बीएसई लिमिटेड (एक्सचेंज) चे खालील दिलेल्या उपविधी महाराष्ट्राच्या अधिकृत राजपत्रात प्रकाशित करणे आवश्यक आहेः

बीएसई लिमिटेडच्या उपविधी

१) प्रकरण सात - उपविधी ५(ब) - ट्रेडची अभेद्यता - वरील कलम (अ) मध्ये काहीही असले तरी, एक्सचेंज बोर्डाने अधिकृत केलेली व्यक्ती/समिती, स्वतःहून किंवा त्यांच्या सदस्यांकडून प्राप्त झालेल्या विनंतीनुसार, सेबी आणि एक्सचेंजने वेळोवेळी जारी केलेल्या नियम/परिपत्रकांनुसार ट्रेड रद्द करू शकते किंवा ट्रेडची किंमत योग्य किमतीवर रीसेट/पुनर्योजित करू शकते, जर असे करण्याचे ठोस आणि पुरेसे कारण आहे आणि ते गुंतवणूकदारांच्या हितासाठी, बाजार अखंडतेसाठी आणि किंमत शोध यंत्रणेच्या देखभालीसाठी आहे याची खात्री असेल.

२) प्रकरण सात - उपविधी ५(इ) - ट्रेडची अभेद्यता - ट्रेड रद्द करण्याचा किंवा व्यापाराची किंमत रीसेट/पुनर्योजित करण्याचा एक्सचेंजचा निर्णय, पीडित पक्षाच्या विनंतीनुसार, सेबी/एक्सचेंजने वेळोवेळी विहित केलेल्या समितीद्वारे पुनर्विलोकनाच्या अधीन आहे. कोणत्याही परिस्थितीत, ट्रेड रद्द केल्याने किंवा ट्रेडची किंमत पुन्हा बदलल्याने उद्भवणाऱ्या कोणत्याही नुकसानासाठी/दायित्वांसाठी एक्सचेंज जबाबदार राहणार नाही.

बीएसई लिमिटेड करीता

शैलेश जैन,
प्रमुख – विधी.

विशाल भट,
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी.

ठिकाणः मुंबई.

दिनांक : १७ जुलै २०२५.

कॉर्पोरेट ओळख क्रमांक (सीआयएन)- L67120MH2005PLC155188.

नोंदणीकृत कार्यालय :

बीएसई लिमिटेड, २५ वा मजला, पीजे टॉवर्स,

दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई – ४०० ००१.

BSE LIMITED

Bye-Laws of BSE Limited

Pursuant to the approval received from SEBI, the below given Bye-Laws of BSE Limited (Exchange) are required to be published in the Official Gazette of State of Maharashtra:

Bye-laws of BSE Limited

(1) Chapter VII - Bye-Law 5(b) – Inviolability of Trade – Notwithstanding anything contained in clause (a) above, a person(s) /committee(s) authorized by the Board of the Exchange may, suo moto or pursuant to a request received from its member annul the trade(s) or reset the price of the trade(s) to an appropriate price in accordance with regulations/circulars issued by the SEBI and the Exchange from time to time, provided it is satisfied that there exists a cogent and sufficient cause to do so and is in the interest of investors, market integrity and maintenance of price discovery mechanism.

(2) Chapter VII - Bye-Law 5(e) - Inviolability of Trade – The decision of the Exchange to annul the trade (s) or reset the price of trade (s) is subject to review, on the request of the aggrieved party, by the committee as prescribed by SEBI / the Exchange from time to time. The Exchange, in any case, shall not be liable for any losses/liabilities arising out of annulment of the trade(s) or resetting of the price of the trade(s).

For BSE Limited

SHAILESH JAIN,
Head - Legal

VISHAL BHAT,
Company Secretary & Compliance Officer.

Place: Mumbai

Date: 17th July, 2025

Corporate Identification Number (CIN) - L67120MH2005PLC155188

Registered Office:

BSE Limited, 25th Floor, P. J. Towers,

Dalal Street, Fort, Mumbai – 400 001

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.